# परदेशी पर्यटन वाढविण्यात हॉटेल आणि रेस्तराँ व्यवसायाचे योगदान मोलाचे ठरेल

## दिलीप वेंगसरकर यांचे प्रतिपादन, हॉटेल अँड रेस्तराँ असोसिएशन अधिवेशनाचे उद्घाटन

**प्रतिनिधी** | सिडको

परदेशी पर्यटन वाढविण्यासाठी हॉटेल आणि रेस्तराँ व्यवसायाचे योगदान मोलाचे ठरेल तसेच कोरोना महामारीमुळे हॉटेल, रेस्तराँसह इतरही क्षेत्र ठप्प झाली होती. परंतु काही महिन्यांपासून परिस्थिती पूर्वपदावर येत असून हॉटेल क्षेत्रही लवकरच पूर्वपदावर येईल, अशी अपेक्षा भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांनी व्यक्त केली. यावेळी त्यांनी क्रिकेटच्या विविध स्पर्धेतील आठवणींना उजाळा दिला.

हॉटेल अँड रेस्तराँ असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया संस्थेतर्फे पाथर्डी फाटा येथील हॉटेल रेडीसन ब्लू येथे १९ व्या विभागीय अधिवेशनाचे उद्घाटन वेंगसरकर यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. वेंगसरकर पुढे म्हणाले की, शारजा येथील १९८३ सालच्या वर्ल्ड कपमध्ये वेस्ट इंडिज, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया हे बलाढ्य संघ होते. परंतु, अष्टपैलू कामगिरी, सांघिक भावनेने खेळलो, त्यामुळे भारत पहिल्यांदाच वर्ल्ड कपचा मानकरी ठरला.

यावेळी असोसिएशनचे अध्यक्ष प्रदीप शेट्टी यांनी म्हटले की, कोविड महामारीमुळे सर्वात जास्त नुकसान हॉटेल उद्योगाचे झाले आहे. यात ८५ टक्के हॉटेल, रेस्तराँ पूर्वपदावर आले आहेत. भारताच्या जीडीपीमध्ये तसेच परकीय चलन कमविण्यात या उद्योगांची महत्त्वाची भूमिका असून मोठ्या प्रमाणात रोजगार देणारा हा उद्योग आहे. यासाठी शासनाने जीएसटी १८ टक्क्यांवरून सात ते आठ टक्क्यांवर आणल्यास दक्षिण आशियाई देशांमध्ये स्पर्धात्मक टुरिझमला वाव मिळेल. या अधिवेशनामुळे नाशिकमधील वाईन पर्यटनासोबतच धार्मिक, कृषी, सांस्कृतिक, साहसी पर्यटन तसेच त्याच्याशी संबंधित अनेक सेवांना चालना मिळणार आहे. चेतन मेहरा यांनी वेंगसरकर यांचा सत्कार केला. या निमित्ताने पश्चिम विभागातील हॉस्पिटॅलिटी उद्योगातील शेकडो नामवंत व्यावसायिक नाशिकमध्ये आले आहेत.




हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन अधिवेशनाचे उद्घाटनप्रसंगी भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर. समवेत मान्यवर.

### तीन वर्षानंतर अधिवेशन

३ वर्षानंतर हे पश्चिम विभागीय अधिवेशन होत असून अधिवेशनात अनेक हॉटेल व रेस्तराँचे प्रतिनिधी, शासकीय अधिकारी, गुंतवणूकदार आणि उद्योगातील दिग्गज सहभागी झाले आहेत. या ३ दिवसीय अधिवेशनात हॉस्पिटॅलिटी उद्योगापुढील आव्हाने आणि संधीची माहिती, नवे तंत्रज्ञान व नव्या उत्पादनाची माहिती तसेच नेटवर्किंग ची संधी विषयांवर चर्चा होईल. यावेळी समिर पारीख, डी. एस. अडवाणी उपस्थित होते.